दैनिक **रायगड नगरी**

अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २११ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# उद्धव ठाकरे शेतकरी प्रश्नावरुन शिंदे सरकारला घेरणार

## विदर्भातून शेतकरी मेळावा घेवून रणशिंग फुंकणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**उद्धव ठाकरे शिंदे फडणवीस सरकारच्या विरोधात रणशिंग फुंकणार आहेत. २६ नोव्हेंबरला चिखली बुलढाणा येथे ठाकरेंची सभा होणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे पहिला शेतकरी मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसंदर्भात आवाज उठवण्यासाठी उद्धव ठाकरेंच्या मविआचं सरकार गेल्यानंतरच्या पहिल्या शेतकरी मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे.शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे बुलढाणा जिल्ह्यातील चिखलीत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर एल्गार पुकारतील. २६ नोव्हेंबरला शेतकरी मेळावा आयोजित करण्यासंदर्भात मातोश्री निवासस्थानी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.**



उद्धव ठाकरे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरुन शिंदे सरकारला घेरण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरेंनी नुकताच औरंगाबाद जिल्ह्यात परतीच्या पावसानं झालेल्या नुकसानाची पाहणी केली होती. उद्धव ठाकरे हे शेतकऱ्यांच्या जाहीर सभेत बुलढाण्याच्या चिखलीतून शिंदे सरकारवर हल्लाबोल करतील.

शेतकऱ्यांना शिंदे सरकारकडून काय मिळतेय, याची माहिती ठाकरे गटाकडून घेतली जात आहे. उद्धव ठाकरेंच्या जिल्हावार आणि विभागवार बैठका सुरु आहेत. १४ नोव्हेंबरपर्यंत बैठकांचं सत्र सुरु राहणार आहे. त्याचवेळी शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्या महाप्रबोधन यात्रेचा दुसरा टप्पा सुरु होत आहे. त्यामुळं येत्या काही दिवसातचं शिवसेना ठाकरे गट शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर हल्लाबोल करण्याची शक्यता आहे.

**शिवसेनेतील बंडखोरीनंतर दुभंगलेल्या शिवसेनेला बळ देण्याचे काम पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांचे सुपुत्र आदित्य ठाकरे जोमाने करत आहेत. संपूर्ण राज्यभर ठाकरे पिता-पुत्र दौरे करत शिवसेनेची नव्याने बांधणी करत आहेत. यादरम्यान आदित्य ठाकरे पुढील सोमवारी ७ नोव्हेंबर रोजी बुलढाणा जिल्हा दौर्‍यावर येत असल्याची माहिती शिवसेनेतील सूत्रांकडून मिळाली होती. मेहकर आणि बुलढाणा या दोन ठिकाणी आदित्य ठाकरे यांची जाहीर सभा होणार असून ते काय बोलतील? याकडे आतापासूनच अनेकांचे लक्ष लागले आहे.**

# प्रकल्पग्रस्तांचा बीपीसीएलच्या प्रवेशद्वारावर गेटबंद आंदोलन छेडण्याचा इशारा

## तालुक्यातील सर्व पक्षियांचा गेटबंद आंदोलनाला पाठींबा



**दै.रायगड नगरी । उरण**

**उरण येथील बीपीसीएल प्रकल्पात सुमारे १५० प्रकल्पग्रस्त शेतकरी मागील ३० वर्षांपासून अद्यापही नोकऱ्यांपासून वंचित आहेत. या प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांचा नोकऱ्यांसाठी गेल्या ३० वर्षांपासून जोरदार संघर्ष सुरू आहे. मात्र ३० वर्षांच्या संघर्षानंतरही प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळाला नसल्याने प्रकल्पग्रस्तांनी प्रकल्पाच्या प्रवेशव्दारावरच बेमुदत सुरू केले आहे. साखळी उपोषणानंतरही बीपीसीएल प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळत नसल्याने संतप्त झालेल्या प्रकल्पग्रस्तांनी ९ ऑक्टोबर रोजी गेटबंद आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.**

उरण तालुक्यातील भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीत ३० वर्षांपूर्वी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचा प्रकल्प उभारण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या अखत्यारीतील या प्रकल्पासाठी भेंडखळ, बोकडविरा, डोंगरी, फुंडे आदी गावातील सुमारे ३०० शेतकऱ्यांच्या २०७ एकर जमीन संपादित करण्यात आलेल्या आहेत. जमिनी संपादन करताना प्रकल्पग्रस्तांना वारेमाप आश्वासने देण्यात आली होती. यामध्ये प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्याच्या आश्वासनांचा समावेश आहे. मात्र आजतागायत ३०० प्रकल्पग्रस्तांपैकी फक्त १७० लोकांनाच नोकऱ्या मिळाल्या आहेत. उर्वरित प्रकल्पबाधीतांनाही प्रकल्पात नोकऱ्या देण्याच्या मागणीसाठी मागील ३० वर्षांपासून बीपीसीएल विरोधात प्रकल्पग्रस्तांचा जोरदार संघर्ष सुरु आहे.

बीपीसीएल प्रशासनासोबत अनेकदा निवेदन, चर्चा, बैठका पार पडलेल्या आहेत. निदर्शने, मोर्चे, आंदोलनही करण्यात आली आहेत. मात्र प्रकल्पग्रस्तांच्या पदरी आश्वासनांशिवाय काहीही हाती लागले नाही. आता तर बीपीसीएल प्रकल्पाचे खासगीकरण करण्यात आले आहे. या खासगीकरणानंतर येथील प्रकल्पाचा विस्तार करण्यासाठी १४०० कोटी रुपये खर्चून एचपीसीएल प्रोजेक्ट, स्टोरेजटॅन्क आदी उभारण्यात येत आहेत. त्यानंतरही स्थानिक भुमीपुत्र प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या आश्वासनांना हरताळ फासून आणि भुमीपुत्रांना डावलून मोठ्या प्रमाणात परप्रांतीय कर्मचाऱ्यांची भरती केली जात आहे.


स्थानिकांना मात्र नोकर भरतीपासून वंचित ठेवण्यात येत आहे. यामुळे संतप्त झालेल्या प्रकल्पग्रस्तांनी कंपनी प्रशासनाशी अनेकवेळा पत्रव्यवहार केला. परंतु बीपीसीएल कंपनी प्रशासनाकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे बीपीसीएल प्रकल्पाच्या मनमानी कारभारामुळे प्रकल्पग्रस्त त्रस्त झाले आहेत. प्रकल्पग्रस्तांना बीपीसीएल प्रशासन जुमानत नसल्याचे चित्र निर्माण झाले आहे. त्या व्यतिरिक्त १७० स्थानिक प्रकल्पग्रस्त कामगारांपैकी सुमारे ८० कामगार सेवा निवृत्त झाले आहेत. तर काही मृत्यू .../२

# अष्टमी बाजूकडील जॉगिंग ट्रॅक बनला आहे दारुड्यांचा अड्डा

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा -अष्टमी नगरपालिका हद्दीतील कुंडलिका नदी संवर्धन प्रकल्पातील अष्टमी बाजूकडील जॉगिंग ट्रॅक दारुड्यांचा अड्डा बनत चालला असल्याने याचा सामाजिक स्वास्थ्य बिघडण्यावर परिणाम होताना दिसत आहे. नागरिकांतुन याबाबत नाराजी व्यक्त होत आहे.

रोहा -अष्टमी नगरपालिकेने शहराचे सृष्टीसौंदर्य वाढावे व नागरिकांना सकाळ-सायंकाळ मोकळ्या वातावरणाचा श्वास घ्यावा या उद्देशाने लाखो-करोड़ो रूपये खर्च करून सुंदर अशा कुंडलिका नदी संवर्धन प्रकल्पाची उभारणी केली आहे. त्या प्रकल्पाचे रोहे शहरासह परिसरातील रहिवासी वर्गाने स्वागत करून त्याचा चांगला फायदा होताना दिसत आहे.परंतू हे सगळे सकारात्मक होत असतानाच कुंडलिका नदी संवर्धानाचे



सौंदर्य बिघडवण्यास व सामाजिक स्वास्थ बिघडण्याच्या घटना अलिकडील कालावधीत घडू लागल्याने जनमाणसातून तीव्र संताप व्यक्त होताना दिसत आहे.याच प्रकल्पाजवळील अष्टमीकडील छोटा ट्रेक दारुड्यांचा अड्डा बनत चालला असल्र्याने याचा सामाजिक स्वास्थ्यावर बिघडण्यावर परिणाम होताना दिसत आहे.तर दुसरीकडे भर दिवसा प्रेमी युगुळांचा सुळसुळाट वाढू लागल्याचे दिसून येत आहे. कोणाचाही धाकधपाटा नसल्याने जसे हा .../२

**पनवेल प्रांत कार्यालयाचा भ्रष्टाचाराचा भांडाफोड**

**उद्याच्या अंकी जरुर वाचा**

# ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांना मातृशोक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ज्येष्ठ पत्रकार माधव बाबू पाटील यांच्या मातोश्री तुळसाबाई बाबु पाटील यांचे रविवारी (दि. ३० ऑक्टोबर) अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९३ वर्षाच्या होत्या.

तुळसाबाई पाटील यांच्या पार्थिवावर बामणडोंगरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्ययात्रेस सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, वारकरी पत्रकारिता, वैद्यकीय, विधी आदी क्षेत्रातील मान्यवरांसह पंचक्रोशीतील नागरिक, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तुळसाबाई प्रेमळ आणि हसतमुख स्वभावाने परिचित होत्या.

त्यांचा होम विधी मंगळवार दिनांक ०१ नोव्हेंबरला बामणडोंगरी येथील राहत्या घरी, दशक्रिया विधी मंगळवार दिनांक ०८ नोव्हेंबर रोजी श्री क्षेत्र लांगेश्वर मोरावे येथे तर उत्तरकार्य शुक्रवार दिनांक ११ नोव्हेंबरला बामणडोंगरी निवासस्थानी होणार आहे.

# महाराष्ट्र प्रदेश युवक कॉँग्रेसच्या सचिवपदी ॲड.प्रितेश साहू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र प्रदेश युवक कॉँग्रेसच्या सचिव पदी ॲड. प्रितेश हरिप्रसाद साहू यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे.

ॲड. प्रितेश हरिप्रसाद साहू हे एक अभ्यासू व्यक्तिमत्व असून युवक कॉँग्रेसमध्ये दर्जेदार कार्य करत आहेत व या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र प्रदेश युवक कॉँग्रेस अध्यक्ष कुणाल राऊत यांनी ॲड. प्रीतेश हरिप्रसाद साहू यांची महाराष्ट्र प्रदेश युवक सचिव या पदी नियुक्ती केली आहे. त्यांच्या या निवडीचा भविष्यकाळात युवक कॉँग्रेसला निश्चितच फायदा होईल असा विश्वास जिल्हा



अध्यक्ष अभिजित पांडुरंग पाटील यांनी त्यांचे अभिनंदन करतांना व्यक्त केला व आशीर्वाद देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

त्याच बरोबर उपस्थित जिल्हा कॉँग्रेस, महिला कॉँग्रेस, युवक कॉँग्रेस व सर्व सेलच्या कार्यकर्त्यांनी यांच्या निवडीचे स्वागत केले व मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# महामार्ग ते महाड स्थानक रस्ता रखडणार

**दै.रायगड नगरी । महाड**

मुंबई गोवा महामार्ग ते महाड परिवहन स्थानकापर्यंतच्या रस्त्याचे काम आणखी काही काळ रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काल (रविवारी) महाडचे आमदार भरतशेठ गोगावले यांनी या रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन केले होते. मात्र दुसऱ्याच दिवशी या ठिकाणी कोणतेही काम सुरु करु नये असे पत्र परिवहन महामंडळाने महाड नगर पालिकेला दिल्याने हे काम लांबणीवर पडू शकते.

ज्या जागेवर हे काम होणार आहे ती परिवहन महामंडळाच्या मालकीची आहे. या ठिकाणी रस्ता बांधण्यासाठी ही जागा महाड नगर पालिकेकडे हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही.

रविवारी आ. गोगावले यांनी या ठिकाणी कामाचे भूमीपूजन केले आणि एक महिन्यात रस्त्याचे काम पूर्ण होईल असे जाहीर केले. मात्र दुसऱ्याच दिवशी , सोमवारी, परिवहन महामंडळाच्या पेण येथील विभाग नियंत्रकांनी या ठिकाणी कामाला सुरुवात करु नये असे पत्र महाड नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना दिले. जागेची संयुक्त मोजणी झालेली नाही. भविष्यात हद्दीवरुन वाद निर्माण होवू नयेत यासाठी ही मोजणी पूर्ण होईपर्यंत कामाला प्रारंभ करु नये असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

हा रस्ता आणि जागा राज्य परिवहन महामंडळाच्या मालकीची आहे. अनेक वर्ष या ठिकाणी महामंडळाने देखभाल दुरुस्तीचे काम न केल्याने रस्त्याची वाताहात .../२

# कार्तिकी छटपूजेचा करंजाडेत भक्तिमेळा

## शेतकरी कामगार पक्ष करंजाडेकडून आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सालाबादप्रमाणे शेतकरी कामगार पक्ष करंजाडेच्या वतीने सरपंच रामेश्वर आंग्रे व उपसरपंच योगेंद्र कैकाडी यांच्यावतीने करंजाडे परिसरात वास्तव्यास असलेल्या उत्तर भारतीय बांधवांनी सहकुटुंब हजेरी लावून करंजाडे नदीवर दुग्धाभिषेक अर्पण करत सूर्याला अर्घ्य देऊन विधिवत छटपूजा केली. यावेळी उसळलेल्या आबालवृद्धांच्या गर्दीने संपूर्ण परिसरात भक्तिमेळा फुलला होता. उत्तर भारतात दरवर्षी कार्तिक महिन्याच्या संध्येला मोठ्या जल्लोषात 'कार्तिकी छटपूजा' साजरी केली जाते.



यावेळी कोकण शिक्षक मतदार संघांचे आमदार बाळाराम पाटील, पनवेल नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष उद्योजक जे.एम. म्हात्रे, सरपंच रामेश्वर आंग्रे, उपसरपंच योगेंद्र कैकाडी, मंगेश बोरकर यांच्यासह कार्यकर्ते, सदस्य महिला मोठया संख्येने उपस्थित होते.

छटपूजेचा सण सलग चार दिवस साजरा केला जातो. यामध्ये उत्तर भारतीय हिंदी भाषिक बांधव ३६ तासांचा निर्जळी उपवास करतात. महिला-पुरुष दोघेही कडक उपवास करतात. कार्तिक महिन्याच्या चतुर्थीपासून छटपर्वाला प्रारंभ होतो आणि सप्तमीला या पर्वाची सांगता होते. ३६ तासांच्या उपवासानंतर महिला व पुरुष नदीकाठी एकत्र येऊन सूर्यदेवतेला अर्घ्य देतात आणि माता छटीची पूजा करतात. रविवारी (दि.३०) संध्याकाळी करंजाडे परिसरातील सर्व उत्तर भारतीय नागरिकांनी दुपारी .../२



# नवा अंकुश

समाज माध्यमांबाबत ती वापरणाऱ्यांच्या तक्रारींच्या निवारणासाठी विविध समित्या नेमण्याचा केंद्र सरकारच्या निर्णयावर भाष्य करताना त्याची पार्श्वभूमी पाहणे महत्त्वाचे ठरते. समाज माध्यमांमुळे सर्वसामान्यांना अभिव्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे यात शंका नाही. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक अशा विविध क्षेत्रांतील घटना घडामोडींबद्दल प्रत्येकाचे स्वतःचे म्हणून एक आकलन असू शकते. ते त्यांना मांडता येणे किंवा त्याद्वारे इतरांवर प्रभाव टाकणे समाज माध्यमांमुळे शक्य होते. त्यामुळे समाज माध्यमांवर विविध प्रकारच्या मतप्रवाहांचा कोलाहल असणे स्वाभाविकच. लोकशाहीतच मतभिन्नता स्वागतार्हच असते. म्हणूनच समाज माध्यमे लोकशाहीला पूरकच ठरतात. मात्र, आपले मत इतरांवर लादण्यासाठी खरे आणि खोट्याचे बेमालूम मिश्रण करणाऱ्यांमुळे, द्वेष फैलावून समाजात फूट पाडणाऱ्यांमुळे आणि बीभत्स धंदेवाईक वृत्ती असलेल्यांमुळे समाज माध्यमे अशांतता निर्माण करण्याला, ऐक्याला तडे देण्यालाही कारणीभूत ठरत आहेत. सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय हितसंबंधी मंडळींच्या कारवायांमुळे ही नवी माध्यमे समाजासाठी आणि देशासाठी धोकादायक ठरण्याची भीती आहे. त्यांच्या नियमनाची आवश्यकता भासते, ती यासाठी. याबाबत वेळोवेळी कायदे केले गेले. खुद्द समाज माध्यमांनाच अधिक उत्तरदायी बनविण्यासाठी प्रयत्न झाले. कुप्रवृत्तींकडून आपला गैरवापर होणार नाही यासाठी; तसेच खातेधारकांच्या तक्रारींच्या निराकरणासाठी या माध्यमांना अंतर्गत व्यवस्था करणेही भाग पाडले गेले. समाजात द्वेष पसरविणाऱ्यांपासून समाज विघातक कारवायांना उद्युक्त करणाऱ्यांपर्यंत सर्व अपप्रवृत्तींना रोखण्याचा प्रयत्न झाला खरा; परंतु अपप्रवृत्ती काही कमी झाल्या नाहीत. या माध्यमांचा गैरवापर कायमच राहिला आहे. माहिती तंत्रज्ञान कायद्यात नव्याने दुरुस्ती करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय होण्याला ही पार्श्वभूमी आहे. या कायद्यातील दुरुस्तीनुसार, तक्रारींच्या निराकरणासाठी विविध प्रकारच्या समित्या (जीएसी) पुढील तीन महिन्यांत स्थापल्या जातील. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यू ट्यूब आदी विविध समाज माध्यमांबद्दल या समित्यांकडे थेट तक्रार करण्यात येणार आहे. एक अध्यक्ष आणि दोन स्थायी सदस्य यांचा समावेश असलेल्या समित्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी तज्ज्ञांची मदत घेऊन निकाल देणार आहेत. त्यांचे पालन करणे संबंधित माध्यमांना बंधनकारक असेल. द्वेषमूलक, प्रक्षोभक किंवा समाजात फूट पाडण्यासाठी समाज माध्यमांचा वापर करणाऱ्यांचे खातेही बंद करण्याचा आदेश या समित्या देऊ शकतात. अशा रीतीने समाज माध्यमांवर सरकारचे थेट नियंत्रण असू शकेल. यामुळे माध्यमांचे नियमन होण्याऐवजी त्यांचे नियंत्रण केले जाईल आणि त्यांचा राजकीय वापर होईल, अशी टीका होत आहे. देशात यापूर्वीही मुख्य प्रवाहातील माध्यमांना सरकारी मुस्कटदाबी सहन करावी लागली असल्याने समाज माध्यमांबाबतच्या सरकारच्या निर्णयावर टीका होते आहे. माध्यमांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न प्रत्येक सत्ताधारी करीत आले आहेत; आताही याची प्रचिती येते आहे. मुख्य धारेतील माध्यमांबरोबरच आता समाज माध्यमांबाबतही हा प्रकार होत असल्याने चिंता वाटणे अगदीच अस्वाभाविक नाही. म्हणूनच नियमांमधील बदलातील दुरुस्तींबाबत थेट सरकारनेच तातडीने खुलासा केला आहे. कोणा एका समाज माध्यमाला समोर ठेवून हा कायदा किंवा त्यातील दुरुस्ती करण्यात आला नसल्याची स्पष्टता माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी म्हणूनच दिली आहे. आपल्याबाबतच्या तक्रारींबद्दल समाज माध्यमे सजग राहून दोषींवर कारवाई करीत नसतील तर ते स्वीकारण्यासारखे नाही, अशा शब्दांत त्यांनी समाज माध्यमांना एक प्रकारे तंबी दिली आहे. दोषी खातेधारकांचे खाते बंद करण्यापासून विविध दंडात्मक कारवाई समाज माध्यमे आताही करीत असली, तरी ते कठोरपणे पावले उचलताना सदैव दिसतातच असे नाही. अनेकदा त्यांच्या कारवायांना प्रतीकात्मक स्वरूप प्राप्त झाल्याचे जाणवले आहे. समाज माध्यमांचा वापर दहशतवादी आणि मूलतत्त्ववादी करीत असल्याकडे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनीही लक्ष वेधले आहे. अनेक दहशतवादी संघटना प्रक्षोभक आशय 'टूल किट'प्रमाणे वापरत असल्याकडे त्यांनी अंगुलिनिर्देश केला आहे. आपल्याले हवे तसे कथन निर्माण करण्यासाठी समाज माध्यमांवर काही विचारधारा, चळवळी आणि पक्ष 'टूल किट'चा वापर करीत असल्याकडे यापूर्वीही लक्ष वेधले गेले आहे. जयशंकर यांनी दहशतवाद आणि 'टूल किट' यांचा सहबंधही उलगडून दाखवला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने समित्यांमार्फत दंडात्मक कारवाईसाठी पुढे सरसारवले आहे. सत्ताधारी पक्ष आपल्या सोयीने कारवाई करणार, असा अर्थ कोणी काढत असेल, तर तो चुकीचा ठरविण्याची जबाबदारी सरकारची आणि तिने नेमलेल्या समित्यांची असेल. लवकरच या समित्या स्थापल्या जातील, त्यांवर कोणाची वर्णी लागते, तक्रारींच्या निवारणासाठी कशी पावले पडतात आणि कोणावर दंडात्मक कारवाई होते यांतून सरकारचा हेतू स्पष्ट होईल.

# स्व.श्रीमती इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व स्व. सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी तर्फे आपल्या देशाचे पहिले गृहमंत्री, पोलादपूरुष स्व. सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान भारत रत्न स्व. श्रीमती इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी कॉंग्रेस भवन येथे पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष अभिजित पांडुरंग पाटील यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली.



सदर कार्यक्रमास कॉंग्रेसचे जेष्ठ नेते डॉ. भक्तीकुमार दवे, शशिकांत बांदोडकर, सरचिटणीस मल्लिनाथ गायकवाड, महिला अध्यक्षा निर्मला म्हात्रे, अनुसूचित जाती महिला अध्यक्ष माया अहिरे, पनवेल शहर ब्लॉक अध्यक्ष लतीफ शेख, नवीन पनवेल अध्यक्ष राहुल जानोरकर, डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ. अमित दवे, खांदा कॉलनी अध्यक्ष जयवंत देशमुख, अध्यक्ष, रोजगार व स्वंयरोजगार विभाग अध्यक्ष नित्यानंद म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष सुधीर मोरे, महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस प्रीतेश साहू, चेतन म्हात्रे, जिल्हा युवक उपाध्यक्ष अभिजित मुडक्कल, पनवेल युवक अध्यक्ष राकेश जाधव, सुमित अंभोरे, नीता शेणोय, आरती ठाकूर आदी नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आक्षी शिलालेख जतन व परिसर सुशोभिकरण कामाचे उद्‌घाटन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मराठी भाषेतील आद्य शिलालेख असलेल्या आक्षी शिलालेखाचे जतन रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करण्यात आले असून, या कामाचे उद्घाटन सोमवारी (ता.३१) राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. या कामासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजना तसेच जिल्हा नियोजन समितीने निधी उपलब्ध करून दिला होता.



मराठी भाषेतील आद्य शिलालेख व आणखी एक शिलालेख असे दोन शिलालेख आक्षी गावात रस्त्याच्या कडेला दुर्लक्षित अवस्थेत उभे होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी शिलालेखाची पाहणी करीत शिलालेख जतन करण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. राज्य सरकारने प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतंर्गत शिलालेख जतन करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला होता.

प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतंर्गत प्राप्त निधीतून आक्षी शिलालेखाचे येथील समुद्रकिनारी असलेल्या साई मंदिर परिसरात सुयोग्य जागेत प्रस्तापित करणे व परिसर सुशोभिकरण करण्यात आले आहे. या कामांचे उद्घाटन सोमवारी उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिलालेखाचे जतन करण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल सर्व उपस्थितांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांचे कौतुक केले.

यावेळी आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले, बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता के. बाय. बारदेसकर, आक्षी सरपंच नंदकुमार वाळंज, माजी जिल्हा परिषद सदस्य कबन नाईक उपस्थित होते.

# राष्ट्रीय एकता दिवस साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जासई येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि .बा. पाटील ज्युनिअर कॉले या शैक्षणिक संकुलामध्ये काल ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री, शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, कामगार नेते सुरेश पाटील यांच्या शुभहस्ते भारताचे पहिले गृहमंत्री, लोहपुरुष ,भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान भारतरत्न इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक आणि रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर श्री अरुण घाग यांनी केले .या प्रसंगी राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात आली.

# भाजीचा टेम्पो असल्याचे भासवून गुटख्याची वाहतूक करणारा टेम्पो अंमली पदार्थ पथकाच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजीचा टेम्पो असल्याचे भासवून भिवंडी पनवेल येथे नेला जाणारा १० लाख १५ हजार रुपये प्रतिबंधित गुटख्याचा नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने सापळा लावून पकडला. या कारवाईत अमली पदार्थ विरोधी पथकाने टेम्पो चालकाला अटक करून गुटख्याच्या साठ्यासह टेम्पो जप्त केला आहे.

नवी मुंबई परिसरात गुटख्याचा साठा वितरित करण्यासाठी भिवंडी मुंब्रा–पनवेल मार्गावरून पनवेल येथे एक टेम्पो जाणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्या आधारे व.पो.नि. बासित अली सय्यद, पोलीस उपनिरीक्षक विजय शिंगे, स.पो. उपनिरीक्षक सलीम इनामदार यांच्या पथकाने मुंब्रा–पनवेल मार्गावरील धानसर टोल नाका येथे सापळा लावला होता. दरम्यान येथे संशयित टेम्पो आला असता या टेम्पो थांबवला. हा टेम्पो असल्याचे भासवण्यासाठी बाहेरील बाजूस भाजीचे प्लास्टिक क्रेट ठेवण्यात आले. या पथकाने टेम्पोची तपासणी असता आत १० लाख १५ रुपये किमतीच्या गुटख्याने भरलेल्या गोणी ठेवण्यात आल्याचे आढळून आले. त्यावर या पथकाने टेम्पोसह गुटख्याचा साठा व २९ प्लास्टिक क्रेट असा एकूण १७ लाख २८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी टेम्पो चालक मोहम्मद नदीम शौकतअली खान (३२) याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून त्याला अटक करण्यात आली आहे. हा गुटख्याचा साठा हा वासिम ऊर्फ साबिर खान, जयराम ऊर्फ मुस्तकिम, रफू, सद्दाम, जावेद, शंकर कुमार हे सर्वजण गुजरात व इतर राज्यातून आणत असल्याचे आढळले आहे. तसेच गुटख्याचा साठा टेम्पोतून मुंबई, पनवेल व इतर भागात विक्रीसाठी वितरित करत असल्याचे आढळले.


## नर्सिंग कोर्स प्रवेश

**जी.एन.एम. / ए.एन.एम.**

**सन २०२२ –२३ वर्षाकरीता प्रवेश उपलब्ध**

**–: शैक्षणिक पात्रता :–**

**बारावी उत्तीर्ण (आर्ट्स/ कॉमर्स/ सायन्स)**

**पत्ता: लाईफ लाईन स्कूल ऑफ नर्सिंग एस.टी. स्टँडसमोर, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, लाईन आळी, पनवेल**

**संपर्क : ९३७२७१६१६० / ९९४७७२०७७७**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल नामे श्री.सुरेश चंद्रा उडेलालजी गुर्जर, पत्ता : लापती, सालारे, नाथद्वारा राजसमद, राजस्थान ३१३३०१ यांनी खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकतीबाबत सौ.रेखा केसरवानी, पत्ता : ४०५, फायर गार्डन, आझान लेन, अंधेरी, मुंबई ४०००५८, यांचे बरोबर दि.२१/१०/२०२२ रोजी भूखंड विक्री करार केलेला आहे व सदर मिळकत त्रिपक्षीय करारनाम्याने हस्तांतरीत करून घेत आहे.

तरी सदर मिळकती संबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, वारस हितसंबंध, गहाण, ताबा, दान, बक्षिस, पोटगी, विक्री, विश्वस्त, कुळ, वहिवाट, अ‍ॅटेचमेंट इ. अगर अन्य कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खलील सही करणार यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे दिलेल्या पत्यावर समक्ष येवून भेटावे जर अशी लेखी खबर अथवा हरकत सर मुदतीत न आल्यास सदर मिळकतीवर कोणचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार अथवा हितसंबंध नाही अगर तसा असल्यास त्याने सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहारा पुरा करतील हे सर्वांस कळावे व त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| तळोजा पाचनंद | १७ | ४१ | ५० |

दि.३१/१०/२०२२
नवी मुंबई

**सही/–**
**अ‍ॅड.देवेंद्र भिका पाटील**
**शॉप नं.१, श्रीजी सोहम, सी.एच.एस.लि., भूखंड क्रं.७६, सेक्टर २१, उलवे, नवी मुंबई–४१०२०६**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## प्रकल्पग्रस्तांचा बीपीसीएलच्या प्रवेशद्वारावर गेटबंद आंदोलन छेडण्याचा इशारा

पावले आहेत. मात्र त्यानंतरही मागील ३० वर्षांपासून एकाही प्रकल्पग्रस्त कामगारांची भरती करण्यात आली नसल्याची माहिती प्रकल्पग्रस्त किरण घरत यांनी दिली आहे.

बीपीसीएल प्रशासन जुमानत संतप्त झालेल्या प्रकल्पग्रस्तांनी येथील भारत पेट्रोलियम विरोधात प्रकल्पग्रस्तांनी संघर्षाची भूमिका घेतली आहे. आधी उपोषण त्यानंतर साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. मात्र या साखळी उपोषणानंतरही बीपीसीएल प्रशासनाकडून प्रश्न सुटला नाही तर ९ ऑक्टोंबर पासुन सर्वपक्षीयांच्या नेतृत्वाखाली गेटबंद आंदोलन छेडण्याचा निर्वाणीचा इशाराही प्रकल्पग्रस्तांनी दिला आहे.

## अष्टमी बाजूकडील जॉगिंग ट्रॅक बनला आहे दारुड्यांचा अड्डा

प्रकल्प म्हणजे दारूचा अड्डाच मांडला असल्याचे एकंदरीत बेवडे मंडळींच्या वर्तनावरून दिसून येत आहे.तर प्रेमी युगुळही चावट चाळे करताना दिसत आहेत. यामुळे सभ्य नागरीकांना शरमेने खाली मान घालण्याची वेळ आली आहे.

आज स्वच्छ सुंदर शहराची संकल्पना राबविली जात असतानाच तरुणांकडून नैतिक जबाबदारी व स्वच्छ सुंदर शहराची संकल्पना राबवण्याची गरज आहे तर पोलीस कार्यवाहीपेक्षा तरुणांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना उत्पन्न होणे गरजेचे आहे. या असभ्य गोष्टी घडत असताना फार मोठ्या पुण्याईचा वारसा लाभलेल्या रोह्याला हे नक्कीच शोभिवंत नसल्याची खंत काही सामाजिक कार्यकर्ते मंडळींनी बोलून दाखवली आहे. तर या निर्जन जॉगिंग ट्रॅक वर दामिनी पथक वगैरे यांचा राऊंड होणे व पोलिसांनी आपला खाक्या दाखविण्याची गरज असल्याचे जनमाणसातून बोलले जात आहे.

## महामार्ग ते महाड स्थानक रस्ता रखडणार

झाली आहे. सध्या तर या ठिकाणी रस्ता असल्याचे कोणतेही लक्षण दिसत नाही. परिवहन स्थानकाच्या नव्या इमारतीच्या कामादरम्यान या ठिकाणी पूर्ण सपाटीकरण करण्यात आले आहे. हा रस्ता महाड नगरपालिकेकडे हस्तांतरीत केला तरच परिवहन स्थानकाच्या नव्या इमारतीला परवानगी देवू अशी अट महाड नगर पालिकेने घातल्यानंतर परिवहन विभागाने रस्ता हस्तांतरीत करण्यास संमती दिली होती. मात्र, ही प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसतानाच या ठिकाणी भूमीपूजनाचा घाट घातला गेला.

## कार्तिकी छटपूजेचा करंजाडेत भक्तिमेळा

चार वाजेपासून तर सायंकाळी सात वाजेपर्यंत करंजाडे नदीवर हजेरी लावून छटपूजेचा विधी पूर्ण केला. उसाच्या बांड्यांची मोळी बांधून ती नदीपात्रात उभी करत दीप प्रज्वलित करत सूर्याला दूध व पाण्याचा अर्घ्य देत दाम्पत्यांनी विधिवत पूजा केली.

यावेळी आमदार बाळाराम पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांनी आपले मनोगत व्यक्त करीत नागरिकांना 'छट पर्व'च्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पनवेल शहर पोलिसांनी परिसरात चोख बंदोबस्त ठेवला होता. पार्किंगची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. दुपारी चार वाजेपासून उत्तर भारतीय नागरिक सहकुटुंब नदीवर येत होते. विविध फळांसह पूजेचे साहित्य मांडून महिला व पुरुषांनी विधिवत पूजा केली. यावेळी नदीवर जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

## जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात

On admission

आरटीएस अपिल क्र...../२०२२

१) श्रीमती.रुक्मिणी विठोबा पाटील
२) विनायक विठोबा पाटील
३) विश्वजीत विठोबा पाटील
४) श्रीमती.रुचिता सचिन पाटील
सर्व रा.मु.रावे, ता.पेण, जि.रायगड — वादी

विरुद्ध

१) श्री.धनाजी बाळाराम घरत
२) श्रीमती.पोशीबाई काशिनाथ पाटील
३) श्री.सुभाष हरी म्हात्रे, ३) श्री.सुभाष हरी म्हात्रे
४) सौ.निर्मला हरी म्हात्रे, ५) श्री.जनार्दन शंकर पाटील
६) श्री.प्रकाश शंकर पाटील
सर्व रा.खारपाडा, ता.पेण, जि.रायगड
७) सौ.सुभद्रा अनंता गावंड,
रा.दिघाटी, ता.पनवेल, जि.रायगड
८) श्री.नारायण काळू घरत,
रा.खारपाडा, ता.पेण, जि.रायगड — प्रतिवादी

तमाम जनतेस व सामनेवाले यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे : कर्नाळा डोलघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील फेरफार नोंद क्र.३९६ विरुद्ध अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दि.१७/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे, सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कर्नाळा डोलघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ६६ | ३/१/अ | ०.४३.१० | ७.८६ |
| ६६ | ३/१/ब | ०.०५.०० | १०.०० |
| ६७ | १ | ०.११.१० | १.९१ |
| १९ | १/ड | ०.०३.५० | ०.६२ |
| १९ | २ | ०.१२.६५ | २.२६ |
| २० | १ | ०.०२.५० | ०.४४ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १३/१०/२०२२

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**

मे.भाकरे सा़ो. यांचे कोर्टात

अर्जदारांतर्फे वकील
अ‍ॅड.भुषण म. म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.८९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०५/१२/२०२२

श्रीमती.यशोदा यशवंत घरत
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पो.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कु.जिज्ञासा यशवंत घरत, रा.मु.पो.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड राहत असून ती अज्ञान असून वरील अर्जदार यांचे व अज्ञान यांचा हिस्सा असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वहाळ, ता.पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नांव | यु.के.नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| वहाळ | ६६+२६२ अ | २२६ | ५ | ०–०३–० | ०.०३ |
| | | ६ | ३ | ०–०१–५ | ०.११ |
| | | ६ | १४ | ०–०९–० | ०.६७ |
| | | १७१ | ३ | ०–०५–६ | ०.५५ |
| | | १७२ | २ | ०–००–१२ | ०.०६ |
| | | ४८३ | ६ | ०–२१–० | ३.९४ |
| | | ४९६ | ४ | ०–०७–० | ०.२२ |
| | | ५०९ | ३ | ०–१२–० | ०.२७ |
| | | ५१५ | ५ | ०–१९–० | ०.४४ |
| | | ४६७ | ५ | ०–०९–० | २.०६ |
| | | २१९ | १० | ०–०६–० | ०.९१ |
| | | ६ | १२ | ०–०५–७ | ०.५३ |
| | | १४१ | ४ | ०–०२–० | ०.२२ |
| वहाळ | ६६+२६२ क | २२१ | १ | ०–०८–० | १.०६ |
| वहाळ | ६६+२६२ ब | २१८ | १ | ०–०८–० | १.१२ |

असून श्रीमती.यशोदा यशवंत घरत, हिला कु.जिज्ञासा यशवंत घरत हिचे पालनकर्ती म्हणून नेमणूक करून मिळावी. तसेच अज्ञानांचा पालनकर्ती श्रीमती.यशोदा यशवंत घरत अज्ञानांची आई हिला अज्ञानांची स्थावर मिळकत विक्री करण्याबाबत परवानगी मिळण्याकरिता अर्ज केला आहे. सदरहू अर्जदार या कु.जिज्ञासा यशवंत घरत हिची अज्ञान पालनकर्ता आई नाही असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीस प्रसिद्धीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्रीमती.यशोदा यशवंत घरत ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि त्यांना कुमारी कु.जिज्ञासा यशवंत घरत हिच्या हिश्श्यास येणाऱ्या मिळकतीचे नैसर्गिक पालनकर्ता त्याच्या हिश्श्याची मिळकत विक्री करता येईल तसेच त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२१/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**जिल्हा न्याया., पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**जिल्हा न्याया., पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कोकण भवनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ



**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

जीवनाच्या सर्व क्षेत्रात सच्चेपणा आणि कायद्याचे पालन करेन, लाच घेणार नाही आणि लाच देणार नाही, सर्व कामे प्रामाणिकपणे आणि पारदर्शक पध्दतीने करेन, जनहितासाठी कार्य करेन अशी प्रतिज्ञा घेऊन भ्रष्टाचाराविरुध्द जनजागृती होण्याच्या उद्देशाने आज कोकण भवनमध्ये दक्षता जनजागृती सप्ताहाचा प्रारंभ करण्यात आला. विभागीय महसूल कार्यालयाच्या बैठक सभागृहात सकाळी ११.०० वाजता उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांनी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली. यावेळी उपायुक्त (विकास) गिरीश भालेराव, मुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो) राजलक्ष्मी येरपुडे आदी उपस्थित होते.

दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात येते, त्या सप्ताहात दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जातो. सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा आणि सत्यनिष्ठा याबद्दलच्या दृढनिश्चयाचे बळकटीकरण करण्यासाठी नागरिकांच्या सहभागाने हा सप्ताह साजरा करण्यात येतो.

यंदाच्या २०२२ या वर्षी केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार ३१ ऑक्टोबर ते ०६ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत या 'दक्षता जनजागृती सप्ताहाचे' आयोजन करण्यात आले आहे. 'भ्रष्टाचारमूक्त भारत–विकसित भारत' ही या कार्यक्रमाची संकल्पना आहे.

उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली. यावेळी श्री.गिरीश भालेराव यांनी यावेळी महाराष्ट्राचे मा. राज्यपाल भगत सिंह कोश्यारी व मा. मुख्यमंत्री, एकनाथ शिंदे यांनी दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त जनतेला दिलेल्या संदेशाचे वाचन केले. याप्रसंगी कोकण भवनमधील विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ.सुरेश गोरेगावकर यांचा मॉरिशस मराठी मंडळाकडून सन्मान

**दै.रायगड नगरी । महाड**

मुळ महाडचे सुपूत्र भोर येथे वैद्यकीय सेवा करणारे तसेच भोर हेल्थ क्लब फाऊंडेशनचे संस्थापक डॉ.सुरेश गोरेगावकर यांना मॉरिशस मराठी मंडळ फेडरेशनच्या वतीने नुकताच आंतरराष्ट्रीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर अचीवमेंट पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला.

मॉरिशस येथील मोका शहरातील मॉरिशस विद्यापीठात नुकत्याच संपन्न झालेल्या या कार्यक्रमामध्ये मॉरिशसचे राष्ट्राध्यक्ष पृथ्वीराज सिंग रोपण यांच्या हस्ते हा पुरस्कार डॉ.सुरेश गोरेगावकर यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले उपस्थित होते.





मॉरिशस विद्यापीठाच्या गांधी इन्स्टिट्यूट सभागृहात या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी मॉरिशसच्या उपपंतप्रधान लीलादेवी डुकून, परराष्ट्रमंत्री ऍलन गणु, मॉरिशस मराठी मंडळ फेडरेशनचे अध्यक्ष असंत गोविंद, मॉरिशसच्या कौन्सिल अध्यक्ष सुधीरचंद्र सुनराणे, भारताच्या राजदूत के.नंदिनी सिंगला, माजी ऊर्जामंत्री नितीन राऊत आदी उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने मिळालेल्या या सन्मानाबद्दल डॉ.सुरेश गोरेगावकर यांनी अत्यंत विनम्र शब्दात आपल्या भावना व्यक्त करताना या सन्मानामुळे माझ्यावरील सामाजिक जबाबदारी अधिक वाढली असल्याची प्रतिक्रिया नोंदवली. महाडचे सुपूत्र असलेल्या डॉ.गोरेगावकर यांना मिळालेल्या या आंतरराष्ट्रीय सन्मानाबद्दल महाडमधील संत रोहिदास नगर तरुण मंडळाचे अध्यक्ष मयुर चांदोरकर, उपाध्यक्ष प्रवीण चांदोरकर तसेच महाडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप–कामत, महाडचे आ.भरतशेठ गोगावले यांसह शहर व तालुक्यातील विविध सामाजिक संस्थांमार्फत त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# संदीप घरत यांनी दिले नांदगाव -सुरुळपेठेत नागाला जिवदान

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील सुरुळपेठेतील बंटी रामचंद्र पुलेकर यांच्या घराजवळ आढळून आलेल्या साडेतीन फूटी नागाला सर्पमित्र संदीप यांनी आपल्या कौशल्याने पकडून जवळील जंगलात सोडून जिवदान दिल्याबद्दल सर्वत्र कौतुक व समाधान व्यक्त होत आहे !

नांदगाव –सुरुळपेठेत बंटी पुलेकर यांना आपल्या घरालगत सकाळच्या वेळेत मागील बाजूस अडगळीत मासेमारी जाळित अडकलेल्या अवस्थेत साडेतीन फूटी नाग आढळून आला.त्यांनी त्याला न मारता तातडीने सर्पमित्र संदीप यांना फोनवरून कळवून मुरुड येथे येऊन त्यांच्या सोबत नांदगाव सुरळपेठ येथे येऊन आपल्या कौशल्याने नागाला पकडून अडकलेल्या जाळीतून सुटका केली व जवळील जंगलात सोडून जिवदान दिल्याने बंटी पुलेकर व संदीप घरत यांचे नांदगाव पंचक्रोशीतून कौतुक होत आहे.

# मेव्हण्याने केले कोयत्याने वार, हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

धारदार कोयत्याने वार करून कोन येथील दीपक म्हात्रे यांना जखमी केल्याप्रकरणी मेव्हणा राजेश पवार यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोन येथील दीपक जनार्दन म्हात्रे यांची बहिण दिपाली हिचे २०१४ मध्ये बेलवली येथील राजेश जनार्दन पवार यांच्या सोबत लग्न झाले. राजेश हा त्यांच्या बहिणीस सांभाळत नसल्याने बहिणीने पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला आहे. दिवाळीचा फराळ घेऊन दीपक म्हात्रे व त्यांची पत्नी अक्षदा हे बेलवली येथे राहणाऱ्या बहिणीकडे निघाले. ते येण्यापूर्वी राजेश व त्यांचा मोठा भाऊ घरात होते. यावेळी राजेशने दिपालीला पैसे मागण्यावरून शिवीगाळ करू लागला. यावेळी त्याला समजावण्याचा प्रयत्न करत असताना त्याने दिपालीच्या लाथ मारली.

यावेळी दीपक व राजेशचा भाऊ जगन यांनी राजेशला घराबाहेर काढले. यावेळी राजेशने दीपकच्या कानाखाली मारली व घरात असलेला कोयता घेऊन दिपकच्या डोक्याच्या पाठीमागील बाजूस वार केले. यावेळी त्यांची पत्नी अक्षदा व दिपाली सोडवण्यास आली असता राजेशने पत्नीच्या उजव्या हातावर कोयत्याने वार केले. यात अक्षदा जखमी झाली. त्यानंतर राजेश पळून गेला. बहिणीचा पती राजेश पवार याने दीपक म्हात्रे यांच्यावर कोयत्याने वार करून त्यांना जखमी केले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक विनायक नाना म्हात्रे व इतर यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे. व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चाणजे, ता.उरण, जि.रायगड**

| गट नं. | हि.नं. | भूधारणा पद्धती | क्षेत्र (हे.आर.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ३९२ | २३/अ | वर्ग–२ | ०.३३.६०<br>पो.ख. ०.०३.३० | ५.३१ |
| | | एकूण | ०.३६.९० | |

वर वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबे कब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरुन आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज, वगैरे बाबत कसलाही हक्क, हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींना सदर हरकतीबाबत ह्या हरकती, संबंधितांच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आम्ही सदर व्यवहार पूर्ण करू व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

दि.०१/११/२०२२

सही/–
**ॲड.नितेश नि. पाटील**
**शॉप नं.१, मुळेखंड फाटा, उरण करंजा रोड, ता.उरण, जि.रायगड–४००७०२**
**मो.नं.९९२०२१०९०१**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : नितळस, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यामध्ये एकूण क्षेत्र ४.७४.२० इतके आहे, त्यापैकी ०.५४.८४ इतके क्षेत्रास कमलाबाई बाळू पावशे, यांचे नावे नमूद असून त्यापैकी ०.१६.०० एवढे विक्रीचे क्षेत्र असून, सदरची मिळकत त्यांच्या मालकी हक्काने व ताबे कब्जाची असल्यामुळे सदरहू मिळकत ही आमचे अशिल साठेकरार व त्यानंतर खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे, तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता आमचे अशिलांच्या वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नितळस, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | गटविभाग/ उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| नितळस | २५२ | ००–४५–१०<br>पो.ख. ००–२९–१०<br>एकूण क्षेत्र ४–७४–२०<br>या मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी ०–१६–००<br>इतके क्षेत्राकरिता | १५.७५ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या सदर मिळकतीमध्ये कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार–मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपला हक्क व हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी, कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध प निजोखमी बोजा विरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही, असे समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत, असे गृहीत धरण्यात येईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.३१/१०/२०२२

सही/–
**रसिक वि. कोठेकर**
**वकील**
**गाळा नं.८, श्री लक्ष्मी को.ऑप. हौ.सोसायटी, टिळक रोड, पनवेल–४१०२०६, जि.रायगड**
**मो.नं.९५६१९१९१११**



मा.गोडसे साो

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१५४३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०५/१२/२०२२

कै.काना उर्फ पांडुरंग सोमा कडू मयतचे वारस
१) श्री.किरण पांडुरंग कडू
वय : ३८ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.प्रवीण पांडुरंग कडू
वय : ३९ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.विजय पांडुरंग कडू
वय : ४१ वर्षे, धंदा : शेती
सर्व रा.मु.बेलपाडा, पो.जासई, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.काना उर्फ पांडुरंग सोमा कडू ह्यांचे निधन दि.२६/११/२०१८ रोजी मु.बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले आहे. तसेच कै.काना उर्फ पांडुरंग सोमा कडू याची आई कै.बारसुबाई सोमा कडू ह्याचे निधन दि.२६/०८/१९९० रोजी मु.बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले आहे. तसेच कै.काना उर्फ पांडुरंग सोमा कडू यांची पत्नी कै.तुलसाबाई पांडुरंग कडू ह्याचे निधन दि.२४/०७/२०१९ रोजी सुयश हॉस्पिटल, सेक्टर ४०, सीवुड, नेरुळ, नवी मुंबई येथे झाल्याने श्री.किरण पांडुरंग कडू, वगैरे ह्यांनी कै.काना उर्फ पांडुरंग सोमा कडू यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नांव | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| गव्हाण | २०२ | २ | ०–२०–८०<br>पो.ख.०.०१.२०<br>एकूण क्षेत्र ०.२२.०० | ३.६३ |

वरील मिळकत ही कै.काना उर्फ पांडुरंग सोमा कडू यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्रीमती.कमल सोपान पाटील, वगैरे हे कै.काना उर्फ पांडुरंग सोमा कडू यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.किरण पांडुरंग कडू, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.काना उर्फ पांडुरंग सोमा कडू यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.३१/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**



मा.सोनावणे साो. कोर्ट

ॲड.संगिता चेतन मोरे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर साो.यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१४२३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१७/१२/२०२२

श्री.कृष्णा सम्पत निमोरिया वगैरे अर्जदार
कोणीही नाही सामनेवाला

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सम्पत राम निमोरिया उर्फ सम्पतराम निमोरिया (Sampat Ram Nimoria @ Sampatram Nimoria) त्यांचे दि.३०/०४/२०१४ रोजी मुंबई येथे निधन झाले आहे. त्यांचे मृत्यूपश्चात अर्जदार नं.१ श्रीमती.कृष्णा सम्पत निमोरिया, २) श्री.वैभव सम्पत निमोरिया, ३) सौ.आशु अरविंद सिंग पुर्वाश्रमीची आशु सम्पत निमोरिया हेच कायदेशीर वारस आहेत.

कै.सम्पत राम निमोरिया उर्फ सम्पतराम निमोरिया (Sampat Ram Nimoria @ Sampatram Nimoria) यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

| मौजे | मिळकत | क्षेत्र |
|---|---|---|
| सेक्टर १०, नवीन पनवेल (पु.), ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६ | हरीमंदिर को.ऑप. हौसिंग सोसायटी, विंग–ए, फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, प्लॉट नं.७९, ८०, ८१, सेक्टर–१०, नवीन पनवेल (पु.), ता.पनवेल | ८७५ चौ.फूट, सुपर कव्हर्ड व ६१२ चौ.फूट कारपेट |

वरील मिळकतीस कै.सम्पत राम निमोरिया उर्फ सम्पतराम निमोरिया (Sampat Ram Nimoria @ Sampatram Nimoria) यांचे मृत्यूपश्चात अर्जदार नं.१ श्रीमती.कृष्णा सम्पत निमोरिया, २) श्री.वैभव सम्पत निमोरिया, ३) सौ.आशु अरविंद सिंग पुर्वाश्रमीची आशु सम्पत निमोरिया हेच कायदेशीर वारस आहेत. वरील मिळकतीस वरील नमूद अर्जदारांची नावे लावण्याचे असल्यामुळे वरील अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरच्या अर्जास इतर अन्य कोणाचीही हरकत असल्यास अथवा अर्जदार व सामनेवाला व्यतिरिक्त अन्य कोणी कायदेशीर वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या मे.कोर्टात हजर राहून लेखी हरकत कागदपत्र व पुराव्यांसह घ्यावयाची आहे.

तरी या नोटीशीद्वारे जाहीर करण्यात येते की, विहित मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीप्रमाणे वारसांना दाखला देण्यात येईल. तद्नंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दि.३१/१०/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**
**पिन कोड - ४०२ २०१**

ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :-(०२१४१)२२२०८४/२२५०९६

**ई-निविदा सूचना क्र.२५ सन २०२२-२०२३(द्वितीय मागणी)**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत (पंजीकृत) कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील झाप सिद्धेश्वर रस्ता. रा.मा.१९८ वर पुलाचे बांधकाम करणे. (नाबार्ड अंतर्गत) | १,२९,८५,००१/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ०१/११/२०२२ (स.१०.००) ते दिनांक १०/११/२०२२ (सं.१८.००)

ई-निविदा उघडणे :- दिनांक १६/११/२०२२ (दु.३.०० वा.) (अधीक्षक अभियंता, सा.बां. रायगड, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात)

खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./सा.बां./अवि/निविदा/ ६५२१ /२०२२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, अलिबाग — ४०२ २०१
दिनांक :- २१/१०/२०२२

सही/–
(ज.ई.सुखदेवे)
कार्यकारी अभियंता
सा.बां.विभाग, अलिबाग
जि.रायगड



सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | करंजाडे १२९ | करंजाडे १३८ब | १२०/८<br>१२७/३ | ०-१६-४<br>०-१७-७ | ३०० चौ.मी. | मौजे करंजाडे नोड भूखंड क्र. २०, सेक्टर ५, क्षेत्र २९९.७८ चौ.मी. | उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) मेट्रो सेंटर क्र. १ पनवेल यांनी दिलेल्या खुलासानुसार व न्यायालयीन वारस दाखलानुसार मूळ भूधारक **कै. सखुबाई रामभाऊ आंग्रे (मयत) यांचे वारस**<br>१. श्री. पुंडलिक रामभाऊ आंग्रे<br>२. श्रीमती यमुनाबाई बाळाराम सांगले<br>३. श्री. श्रीकांत विठ्ठल सुर्वे | एस. सी. एस क्र. ५८/२०१० व एस.सी.एस क्र. ४६८/२००८ या दाव्यातील सद्य:स्थिती अहवालानुसार सदर दाव्यात भूखंड वाटपाकरिता महामंडळाविरूध्द Staus Quo “जैसे थे” किंवा प्रतिबंधात्मक आदेश पारित नाहीत. |
| | | | **एकूण** | ०-३४-१ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, सबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३१३/२०२२-२३

# संक्षिप्त...

## मंगळसूत्र खेचून चोरटे पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रिक्षेत बसलेल्या ३८ वर्षीय महिलेच्या गळ्यातील पाच तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून चोरटे दूचाकीवरून पसार झाले आहेत. खारघर पोलीस ठाण्यात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सेक्टर १७, सेलिब्रेशन सोसायटी, खारघर येथील राधा महेश कुमार ह्या डी मार्ट, सेक्टर १५ येथून घरी जाण्यासाठी रिक्षा करत होत्या. यावेळी रिक्षात बसताना रिक्षा जवळ दोन दुचाकी उभ्या होत्या. यावेळी काळ्या रंगाच्या दुचाकीवर बसलेले दोन अनोळखी इसम दुचाकीवरून खाली उतरले व त्यातील एकाने राधा कुमार यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून नेले. व ते चोरटे दुचाकीवर बसून सेक्टर ३५ खारघरच्या दिशेने पळून गेले.

## आम्ही पिरकोनकर समूहाचा गडकिल्ले स्पर्धेचा बक्षिस वितरण सोहळा

**दै.रायगड नगरी । उरण**

'आम्ही पिरकोनकर समूह' आयोजित पाचव्या दिवाळी गडकिल्ले स्पर्धेचे बक्षिस वितरण रविवार दिनांक ३० ऑक्टोबर २०२२ रोजी संपन्न झाले. उरण तालुक्यातील पिरकोन येथील पंचरत्न इंग्लिश मेडीयम स्कूलच्या सभागृहात रंगलेल्या या दिमाखदार कार्यक्रमात सर्व स्पर्धक किल्लेदारांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व आकर्षक सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

सदर पारितोषकांसाठी अशोक मंगल गावंड यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र ठाकूर यांनी केले. जिवन गावंड (माजी जि.प.सदस्य), गिरीश पाटील(प्राचार्य जेएनपीटी विद्यालय), सायली पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर जगदिश गावंड, अजय शिवकर, मनिश पाटील, नागेंद्र म्हात्रे, शेखर म्हात्रे, चंद्रशेखर भोमकर आदी मान्यवर उपस्थित होते.



### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# माथेरान नगरपरिषदेच्या प्रवासी कराची विक्रमी वसुली ; प्रशासक सुरेखा भणगे यांची महत्त्वाची भूमिका

**दै.रायगड नगरी । माथेरान**

दरवेळी प्रवासी कराचा ठेका दिला जात होता आजवरच्या काळात अनेक ठेकेदारांनी नगरपरिषदेच्या या ठेक्याची पूर्ण रक्कम अदा केलेली नाही त्यामुळेच लाखो रुपयांचे नुकसान नगरपरिषदेला सोसावे लागले आहे परंतु एक वर्षांपूर्वी सुरेखा भणगे यांनी मुख्याधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर नगरपरिषदेचे आर्थिक स्तोत्र असणाऱ्या प्रवासी कर संकलनावर लक्ष केंद्रित करून मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावरील प्रवासी करातील वसुलीच्या बाबतीत जी काही गळती लागली होती ती थांबविण्यासाठी पुढाकार घेतला. ज्या ठेकेदारांना प्रवासी कराचा ठेका कोरोना काळात ७०/३० % प्रमाणे देण्यात आला होता.त्यामध्ये संबंधीत ठेकेदाराने सुध्दा डुप्लिकेट मशीन आणून वसुली केली होती आणि त्यातून त्याने ७०% रक्कम नगरपरिषदेच्या तिजोरीत जमा करण्याऐवजी स्वताच्या खिशात घातली असल्याचे बोलले जात आहे. तो ठेका काढून घेत सर्व प्रवासी कराची वसुली नगरपरिषदेच्या कामगारांमार्फत सुरू केल्यामुळे साहजिकच नगरपरिषदेच्या उत्पन्नात भर पडली आहे.याठिकाणी प्रवासी कराच्या डुप्लिकेट पावत्या सुध्दा पर्यटकांना दिल्या जात होत्या असेही



बोलले जात होते. त्यामुळे नगरपरिषदेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत होते. याकामी सुरेखा भणगे यांनी डिजिटल मशीन द्वारे वसुली करण्यास सुरुवात केल्यामुळे नुकताच दिवाळीच्या हंगामात केवळ सात दिवसात म्हणजेच दि.२४ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर या सात दिवसांत एकूण ४०३५० आबालवृद्ध प्रवासी दाखल झाले यामधुन नगरपरिषदेला २०,५३००० /- इतके विक्रमी उत्पन्न प्राप्त झाले आहे याचे सर्वस्वी श्रेय सुरेखा भणगे यांना जात आहे.एकंदरीत डिजिटल प्रणालीच्या माध्यमातून प्रवासी कराची वसुली होत असल्याने सध्यातरी नगरपरिषदेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होत आहे.

यावेळी बोलताना मुख्याधिकारी सुरेखा भणगे (शिंदे) म्हणाल्या की, माथेरान गिरीस्थान नगरपरिषद च्या उत्पन्नाचा महत्वाचा स्रोत असलेला प्रवासी कर नाका, माहे एप्रिल २०२२ पासून नगरपरिषद मार्फत सुरु आहे. प्रवासी करातील उत्पनात वाढ व्हावी व आर्थिक व्यवहारात पारदर्शकता राहावी यासाठी सप्टेंबर २०२२ पासून डिजिटल तिकीट प्रणाली न.प. द्वारे सुरु केली असून त्याद्वारे अधिक अचूक, आणि त्वरित तिकीट काढता येते, तसेच तिकिटावर अद्ययावत पावती क्रमांक, दिनांक, वेळ, आणि न.प. ची सर्व माहिती बारकोड द्वारे देण्यात आली असल्यामुळे नागरिकांना एक क्लीक वर कार्यालयीन इत्यंभूत माहिती भेटत असल्याने पर्यटक, नागरिक समाधानी आहेत. आणि सर्व माहिती सॉफ्टवेअर प्रणालीशी जोडलेली असल्यामुळे, भविष्यातील प्रत्येक महिन्यातील पर्यटकांची संख्या, लक्षात घेऊन पुढील नियोजन पालिका प्रशासनाला करणे सोयीचे होईल. आणि अधिक चांगल्या सेवा पर्यटकांना देणं सोपं होणार आहे. दिवाळी हंगाम खूप चांगलं गेला आहे, खऱ्या अर्थाने, माथेरान मधील सर्वच घटकांची दिवाळी साजरी झाली, याचा पालिका प्रमुख या नात्याने विशेष आनंद होत आहे.

तर शिवाजी शिंदे म्हणाले की, माथेरान नगरपरिषदेचे प्रमुख उत्पन्नाचे साधन असणाऱ्या प्रवासी करातून नगरपरिषदेला दि.२४ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर या सात दिवसांत एकूण ४०३५० आबालवृद्ध प्रवासी दाखल झाले यामधुन नगरपरिषदेला २०५३००० /- इतके विक्रमी उत्पन्न प्राप्त झाले या वसुली साठी माथेरान नगरीच्या कार्यक्षम प्रशासक सुरेखा भणगे (शिंदे) यांनी प्रथमच संगणकीय डिजिटल प्रणालीचा वापर केल्याने अचूक आणि पारदर्शी वसुली झाली. ठेकेदारी पध्दतीने दिलेल्या या ठेक्यातुन सत्ताधारी गटाने अनेकदा चुकीचे निर्णय घेऊन स्वतः ची झोळी भरण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला परंतु सभागृहातील एकमेव जागरूक नगरसेवकाने या काळ्या धंद्याच्या विरोधात शासन दरबारी व व न्याय पालिकेत दाद मिळवली

यामुळे नगरपरिषदेचे ७२ लाख रुपयांचे नुकसान झाले परंतु करोडो रुपयांचे नुकसान टाळण्यामध्ये यश मिळाले.माथेरान मध्ये आपल्या कार्यकाळामध्ये पहिल्या दिवसांपासून अतिशय पारदर्शी व स्वच्छ हेतूने निर्णय घेऊन माथेरानच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी अतिशय मोलाची भूमिका पार पाडली आहे याबद्दल भणगे यांचे मनः पूर्वक अभिनंदन !

# निरोगी राहण्यासाठी खेळ महत्वाचे : आ.रविशेठ पाटील

**दै.रायगड नगरी । पेण**

आपण स्वतः निरोगी राहण्यासाठी खेळ महत्वाचे असून खेळातून आपल्या शरीर सुदृढ व निरोगी राहते. यामुळे खेळाला व खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे यासाठी पेण तालुका क्रीडा भवनाची निर्मिती केली असल्याचे प्रतिपादन आमदार रविशेठ पाटील यांनी टेबल टेनिस अकॅडमी उद्घाटन प्रसंगी केले.

पेण तालुका क्रीडा भवन येथे रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व रायगड जिल्हाटेबल टेनिस असोसिएशनच्या वतीने टेबल टेनिस अकॅडमीची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी पेणचे आमदार रविशेठ पाटील, रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष तथा छत्रपती पुरस्कार विजेते संजय कडू, सचिन कडू, रायगड जिल्हा टेबल टेनिस प्रशिक्षक उदय मळेकर, वसंत मनोरे, भाऊ मुजावर, जनार्दन जाधव, हितेश पाटील आदीसंह मान्यवर व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले कि, पेण तालुक्यातील



खेळाडूंसाठी गेल्या काही वर्षांपूर्वी या क्रीडासंकुलाची निर्मिती करण्यात आली असून या क्रीडा संकुलाच्या कामासाठी कोणत्याही प्रकारचा निधी कमी पडू दिला नाही. येथे असणाऱ्या क्रीडा अधिकारी यांच्याकडे नेहमी संकुलाच्या कामाबाबत किंवा साहित्य बाबत नेहमी विचारणा करीत असतो. जेणेकरून पेण तालुक्यातील खेळाडू कोणत्याही खेळात कमी पडताकामा नये, टेबल टेनिस सारख्या खेळ आपल्या तालुक्यात प्रचार व प्रसार व्हावा यासाठी सर्वानी प्रयत्न करा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांनी टेबल टेनिस खेळाची निर्मिती कशाप्रकारे झाली, याची पार्श्वभूमी उपस्थितांसमोर मांडली. तसेच पेण तालुक्यातील क्रीडा संकुलाच्या विकासात पेणचे आमदार रविशेठ पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा करून खेळाडूंना नेहमी प्रोत्साहन देण्याचे काम केले असल्याचे सांगितले. यावेळी आमदार रवीशेठ पाटील यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी टेबल टेनिस खेळण्याचा आनंद लुटला.

## सरदार वल्लभ भाई पटेल यांची जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । चौक**

सरदार वल्लभाई पटेल यांच्या १४७ व्या जयंती तसेच राष्ट्रीय एकता दिनाचे निमित्याने खालापूर तालुक्याचे प्रांत अधिकारी अजित नैराळे तहसीलदार आयुब तांबोळी, यांनी चौक येथील सरनोबत नेताजी पालकर महाविद्यालय व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौक, येथे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. यावेळी चौक ग्रामपंचायत नवनिर्वाचित सदस्य निखिल मालुसरे, सुभाष पवार, राजन गावडे, रा. जी.प. सदस्य मोतीराम शेठ ठोंबरे तसेच तूपगावचे नवनिर्वाचित सरपंच रविंद्र कुंभार, शाळेचे मुख्याध्यापक भोंमले सर, संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्रभाई शहा,सुरेश घाग, संतोष सावंत, तनवीर शेख तसेच सर्व आजी माजी विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी उपस्थितानी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते,त्याचे सांगता चौक येथील सरनोबत नेताजी पालकर स्थळा जवळ सांगता करण्यात आली.

# सिडकोमध्ये ३१ ऑक्टोबर २०२२ ते ६ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

केंद्रीय दक्षता आयोगाच्या निर्देशांनुसार दरवर्षीप्रमाणे सिडको महामंडळामध्ये ३१ ऑक्टोबर २०२२ ते ०६ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सिडको मुख्यालयासह सिडकोची नोड्ल कार्यालये, नवीन शहर कार्यालये येथे हा सप्ताह राबविण्यात येणार आहे. भ्रष्टाचार मुक्त भारत – विकसित भारत ही या वर्षीच्या दक्षता जनजागृती सप्ताहाची संकल्पना आहे.

सिडको महामंडळामध्येही दक्षता जनजागृती सप्ताहा दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी ३१ ऑक्टोबर



२०२२ रोजी सिडको भवन येथे उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सत्यनिष्ठेची शपथ दिली. तसेच या प्रसंगी उपस्थितांना मा. राज्यपाल आणि मा. मुख्यमंत्री यांनी दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त दिलेले संदेश वाचून दाखविण्यात आले. सिडको सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास श्री. अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक, डॉ. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, डॉ. शशीकांत महावरकर, मुख्य दक्षता अधिकारी, श्री. विनोद पाटील, अध्यक्ष, सिडको एम्प्लॉईज युनियन, विभागप्रमुख व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्रीय दक्षता आयोगातर्फे भ्रष्टाचारविरोधी जागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शनानुसार देशभरातील शासकीय व निमशासकीय संस्था आणि कार्यालयांमध्येही या सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. अधिकारी व कर्मचारी वर्ग, सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी; समाजाच्या अशा विविध स्तरांतील घटकांमध्ये भ्रष्टाचारविरोधी जागृती निर्माण होऊन भ्रष्टाचाराचे निर्मूलन व्हावे, या उद्देशाने दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार दक्षता जनजागृती सप्ताहामध्ये विविध कार्यशाळा, निंबध स्पर्धा, भित्तीपत्रकाचे प्रदर्शनसारखे विविध जागृतीपर कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

# ज्येष्ठ नागरिकांची १२ व्या मजल्या वरून उडी मारून आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आजारपणाला वैतागलेल्या एका ६९ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने १२व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना खारघर सेक्टर- ३५ डी मध्ये घडली आहे. रमेशकुमार बालकृष्णन इल्लन असे त्यांचे नाव आहे.

धक्कादायक बाब म्हणजे खारघरमध्ये बहिणीच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी आल्यानंतर रमेशकुमार यांनी आत्महत्या केली. रमेशकुमार हे पनवेलमध्ये राहात होते. तसेच मागील काही वर्षांपासून ते आजारपणामुळे त्रस्त होते. आजारपणावर त्यांनी वेगवेगळे उपचार केले, मात्र त्यांचा त्रास कमी होत नव्हता. त्यामुळे या आजारपणाला ते कंटाळले होते. रमेशकुमार हे खारघर सेक्टर ३५ डी मधील गोकुळधाम सोसायटीत १३ व्या मजल्यावर राहणाऱ्या बहिणीकडे तिच्या वाढदिवसानिमित्त आले होते. रात्री ते बहिणीच्या घरी थांबल्यानंतर सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास रमेशकुमार यांनी या इमारतीच्या १२ व्या मजल्यावरुन उडी मारून आत्महत्या केली. या वेळी ते इमारतीच्या खाली उभ्या असलेल्या वाहनावर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन रमेशकुमार यांचा मृतदेह ताब्यात घेतला. रमेशकुमार यांनी आत्महत्येपूर्वी लिहून ठेवलेली चिठ्ठी या वेळी पोलिसांच्या हाती लागली असून, त्यात त्यांनी आजारपणाला कंटाळून आत्महत्या करत असल्याचे म्हटले आहे.

त्यानुसार पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद करून या प्रकरणाच्या पुढील तपासाला सुरुवात केली आहे.






# भारतरत्न लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी



**दै.रायगड नगरी । माथेरान**

कम्युनिटी हॉल येथून शासन निर्देशानुसार राष्ट्रीय एकता दिन साजरा केला जाणार आहे. या दिनाचे औचित्य साधून रन फॉर युनिटी व राष्ट्रीय एकता शपथचे आयोजन माथेरान गिरीस्थान नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.यावेळी नगरपरिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे (शिंदे) यांसह पाणी पुरवठा अधिकारी अभिमन्यु येळवंडे, लेखापाल अंकुश इचके, बांधकाम विभागाचे स्वागत बिरंबोले, कार्यालय अधीक्षक प्रवीण सुर्वे, अन्सार महापुळे, अजय साळुंखे, उमेश मोरे, लक्ष्मण दरवडा, अर्जुन पारधी, नरेंद्र सावंत, स्नेहा साखळकर, मुख्याध्यापक लक्ष्मण ढेबे, सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे, माजी विरोधी पक्षनेते शिवाजी शिंदे, प्रकाश सुतार, भास्करराव शिंदे, धनगर समाजाचे माजी अध्यक्ष राकेश कोकळे, संतोष शेलार, हर्ष शिंदे, सफाई कामगार तसेच नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

भारतरत्न लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती दिनानिमित्त माथेरान नगर परिषदेने राष्ट्रीय एकता दिन साजरा केला व रन फॉर युनिटी व राष्ट्रीय एकता शपथ या कार्यक्रमाचे आयोजन करून भारतरत्न लोहपुरुष सरदार वल्लभ भाई पटेल यांची जयंती साजरी करून माथेरानच्या नागरिकांमध्ये व शाळेच्या मुलांमध्ये नवचैतन्य निर्माण केले त्याप्रसंगी माथेरान नगरीच्या कार्यतत्पर मुख्याधिकारी सुरेखा भणगे, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे,सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे यांनी भारतरत्न लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनावर आपले अनमोल विचार मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय एकता दिनाची शपथ घेऊन, एकता दौड चे आयोजन माथेरान गिरीस्थान नगरपरिषद च्या वतीने करण्यात आले होते, त्यावेळी न प अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, पत्रकार बंधू आणि नागरिक, शिक्षक,विद्यार्थी यांनी उस्फुर्त पणे सहभाग नोंदवीला. सहभागी झालेल्या सर्वाना न.प. माथेरानच्या वतीने प्रशास्ती पत्रक देऊन गौरविण्यात आले.

## जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय एकता दौडला उस्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

देशाचे पहिले गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग येथे राष्ट्रीय एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून दौडला सुरुवात करण्यात आली.

यावेळी तहसिलदार (महसूल) सचिन शेजाळ, अलिबाग तहसिलदार मीनल दळवी, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.सुहास व्हनमाने, क्रीडा प्रशिक्षक संदीप वांजळे, प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी, यतीराज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या एकता दौडचा समारोप अलिबाग समुद्रकिनारा येथे करण्यात आला. यावेळी जे.एस.एम. महाविद्यालय, अलिबाग, पी.एन. पी. महाविद्यालय, अलिबाग, स्पर्धा विश्व अकॅडमी, अलिबाग, प्रिझम सामाजिक विकास संस्था, अलिबाग यासह विविध सामाजिक संस्था, विद्यार्थी व कार्यकर्ते, शासकीय कर्मचारी उस्फूर्तपणे सहभागी झाले होते.

